संच : ब

# ६ वी मराठी

**महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे ३०.**

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र**

**शैक्षणिक प्रगती चाचणी**

**पायाभूत चाचणी २०१७–१८ : इयत्ता – सहावी**

**विषय : मराठी (लेखी)**

**विद्यार्थ्याचे नाव :** ______________________________

**शाळेचे नाव :** ______________________________ **दिनांक :** / /२०१७

**केंद्र :** __________ **ता.** __________ **जि.** __________ **प्राप्त गुण :** [ ]

**हजेरी क्रमांक :** [ ] **तुकडी :** ______ **शिक्षकाची स्वाक्षरी** __________ **एकूण गुण :** [ ४० ]

---

**प्रश्न १.** शब्द ऐकून लिही. (गुण ५)

१) ______________ २) ______________

३) ______________ ४) ______________

५) ______________ ६) ______________

७) ______________ ८) ______________

९) ______________ १०) ______________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न २ ते ४ साठी :** हा उतारा वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

आपण सुंदर दिसावे, नीटनेटके राहावे, असे प्रत्येकाला वाटते, म्हणून आपण दररोज आंघोळ करतो. त्यामुळे आपले शरीर स्वच्छ होते. त्याप्रमाणे कपडेही स्वच्छ हवेत. शरीर व कपडे स्वच्छ असतील, तर मनही प्रसन्न राहते, म्हणूनच म्हटले जाते – 'ज्याचे शरीर निरोगी, त्याचे मन निरोगी.'

आपण आपले घर स्वच्छ, टापटीप ठेवतो. जशी घराची काळजी घेतो, तशीच आपण आपल्या परिसराची काळजी घेणे हे आपले कर्तव्य आहे. परिसर अस्वच्छ ठेवला, तर त्याचा परिणाम शेवटी आपल्यावरच होणार आहे.

अस्वच्छतेमुळे परिसरात दुर्गंधीचे, कचऱ्याचे साम्राज्य पसरते. नाले-गटारे तुंबतात. डास, माश्या, चिलटं अशा अनेक कीटकांची पैदास होते. रोगराईला खतपाणी मिळते. कष्टाने कमावलेला पैसा दवाखाना, औषधपाणी यावर खर्च होतो. रोगामुळे शरीर क्षीण होत जाते. मन दुबळे होते. आपण करत असलेल्या कामावर त्याचा विपरीत परिणाम होतो. आर्थिक स्थिती कोलमडते, म्हणूनच म्हटले जाते – 'स्वच्छता' हा समृद्धीचा पाया आहे. परिसर घाण होणार नाही, यासाठी स्वत:ला तशा सवयी, शिस्त लावणे गरजेचे आहे.

**प्रश्न २.** समृद्धीचा पाया कोणता? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) सवयी ब) स्वच्छता क) शिस्त

**प्रश्न ३.** स्वच्छते संदर्भात दोन घोषवाक्ये लिही. (गुण २)

____________________

____________________

**प्रश्न ४.** आपण आपले कर्तव्य केले नाही तर अस्वच्छतेचे कोणते विपरीत परिणाम होतात त्यापैकी दोन परिणाम लिही. (गुण २)

____________________

____________________



\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th - B \Proof-II\19-06-17\GJ

## संच : ब

**प्रश्न ५ ते ७ साठी :** ही कविता वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

**वासरू**

ओढाळ वासरू रानी आले फिरू, कळपाचा घेरू सोडूनिया.
कानामध्ये वारे भरूनिया न्यारे, फेर धरी फिरे रानोमाळ.
मोकाट मोकाट अफाट अफाट, वाटेल ती वाट धावू लागे.
विसरूनी भान, भूक नि तहान, पायांखाली रान घाली सारे.
थकूनिया खूप सरता हुरूप, आठवे कळप तयालागी.
फिरू जाता मागे दूर जाऊ लागे, आणखीच भागे भटकत.
पडता अंधारू लागले हंबरू, माय! तू लेकरू शोधू येई.

**अनिल**

**प्रश्न ५.** अंधार पडताच वासराने काय केले? योग्य पर्यायाला गोल कर. (गुण १)

अ) रानात फिरू लागले. ब) उड्या मारू लागले. क) हंबरू लागले.

**प्रश्न ६.** रानात फिरायला मिळावे म्हणून वासरू काय करते ते लिही. (गुण २)

______________________________

______________________________

**प्रश्न ७.** विसरूनी भान, भूक नि तहान
पायांखाली रान घाली सारे,
या कवितेच्या ओळींचा अर्थ तुझ्या शब्दात लिही. (गुण २)

______________________________

______________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न ८ ते १० साठी :** ही बातमी वाच आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

### 'डेक्कन क्वीन'चा थाटामाटात वाढदिवस

**पुणे, ता. १ जून** : दररोज पुणे-मुंबई प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांना साथ देणारी आणि दख्खनची राणी म्हणून ओळखली जाणारी 'डेक्कन क्वीन' ने गुरुवारी ८८ व्या वर्षात पदार्पण केले. या गाडीचा वाढदिवस आज (ता. १) पुणे स्टेशनवर थाटामाटात साजरा करण्यात आला. यावेळी प्रवाशांना गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

रेल्वे ग्रुपच्या अध्यक्षा हर्षा शहा यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रेल्वे गाडीला फुले आणि फुगे लावून सजविण्यात आले होते. या वेळी मान्यवरांच्या हस्ते केक कापण्यात आला. त्यानंतर गाडीत जाऊन सर्व प्रवाशांचे स्वागत करून त्यांना गुलाब पुष्प देण्यात आले. याप्रसंगी रेल्वे पोलीस दलाच्या बँड पथकाच्या वादनाने कार्यक्रमात रंगत भरली.

हर्षा शहा म्हणाल्या, ''पाच वर्षाची असल्यापासून मी डेक्कन क्वीनने प्रवास करते. त्यामुळे या रेल्वेच्या अनेक चांगल्या वाईट घटनांची मी साक्षीदार आहे. या गाडीने पुणे आणि मुंबईतील नागरिकांना जवळ आणले आहे.''

**प्रश्न ८.** 'डेक्कन क्वीन'चा वाढदिवस किती तारखेला असतो? (गुण १)

______________________________

**प्रश्न ९.** 'डेक्कन क्वीन' म्हणजे नक्की कोण? (गुण २)

अ) मुलगी    ब) रेल्वे    क) राणी

**प्रश्न १०.** 'डेक्कन क्वीन' चा कितवा वाढदिवस साजरा करण्यात आला? (गुण २)

______________________________

______________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**खालील प्रश्न दिलेल्या सूचनेनुसार सोडव.**

**प्रश्न ११.** खालील वाक्यातील नाम ओळख. त्या नामाचा वापर करून नवीन वाक्य लिही.
रमेशने आंबा खाल्ला. (गुण २)

नाम – ____________________

वाक्य – ____________________

**प्रश्न १२.** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांऐवजी योग्य सर्वनामे वापरून वाक्ये पुन्हा लिही.
अनिता गावाला गेली. <u>अनिता</u> शेतात फिरली. <u>अनिता</u>ला मैत्रिणी आवडल्या. (गुण २)

____________________

____________________

____________________

**प्रश्न १३.** खालील वाक्यातील विशेषण ओळख. त्या विशेषणाचा वापर करून नवीन वाक्य तयार करून लिही. (गुण २)
रेश्माने मुंबईत उंच इमारती पाहिल्या.

विशेषण : ____________________

वाक्य : ____________________

**प्रश्न १४.** 'अकबर बागेत गेला' या वाक्याचे खाली दिलेल्या काळात रूपांतर कर आणि वाक्य लिही. (गुण २)

१) वर्तमानकाळ : ____________________

२) भविष्यकाळ : ____________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न १५.अ)** पुढील वाक्यात अधोरेखित शब्दांऐवजी कंसातील योग्य वाक्प्रचार वापरून वाक्य पुन्हा लिही. (उत्तेजन देणे, दणाणून सोडणे, हुरळून जाणे) (गुण १)

मिरवणुकीतील ढोल-ताश्याच्या आवाजाने सगळा परिसर नादमय झाला होता.

______________________________

______________________________

**ब)** कंसात क्रियापद दिले आहे. त्याचे योग्य रूप तयार करून खालील वाक्यात लिही. (गुण १)

मंदा गाणी छान __________ (म्हणणे)

______________________________



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न १६.** खाली काही शब्द दिले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही.
उंट, सावली, मुले, खाऊ (गुण ५)



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th - B \Proof-II\19-06-17\GJ*

## संच : ब

**प्रश्न १७.** 'किशोर' या मासिकाच्या दिवाळी अंकासाठी 'मुलांच्या नजरेतून' या सदरामध्ये मुलांनी केलेले लेखन छापणार आहेत. त्यासाठी पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर लिही. (गुण ५)

१) मुंगी २) शेतकरी ३) पुस्तक



*\\Com1-pc\f\Question paper\ 4) Payabhut Chachani 2017-18\Bhasha\Student Papers\Std 6th - B \Proof-II\19-06-17\GJ*